**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १३५/२०२०**
राग़ीनी थोटे वि. शिवशंकर थोटे

**निशाणी क्र. १७ वरील आदेश**
(दि. १४ डिसेंबर २०२३)

सदरील अर्ज अर्जदाराने फौजदारी प्रक्रिया संहीतेचे आदेश १, नियम १० नुसार गैरअर्जदाराचे वडील यांना गैरअर्जदार क्र. २ म्हणुन समाविष्ट करण्यात यावे म्हणुन दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदार व त्यांचे वकील गैरहजर.

३. अर्जदार यांच्या वकीलाने नमुद केले की, गैरअर्जदार यांचे वडील श्री. दिनकर शामराव थोटे यांनी अर्जदार यांना धमकावलेले आहे. तसेच अर्जदार व तिचे दोन अपत्ये यांना वडीलोपार्जीत शेत जमीनीवर कोणताही अधिकार प्रस्थापीत करता येवु नये म्हणुन गैरअर्जदाराचे वडीलांनी सदर शेत जमीन विकायला काढलेली आहे. त्यामुळे अर्जदार व त्यांच्या अपत्यांचे नुकसान होवु नये म्हणुन गैरअर्जदाराच्या वडीलांना समाविष्ट करण्यात यावे.

४. सदरील प्रकरणाचे अवलोकन केले असता अर्जदाराने गैरअर्जदाराच्या विरूध्द घरगुती हिंसाचार संरक्षण कायदयाखाली दाखल केलेला आहे. अर्जदाराने नमुद केले आहे की, गैरअर्जदाराचे वडील हे त्यांची वडीलोपार्जीत शेत जमीन विकण्याच्या तयारीत आहे. जर शेत जमीन विकल्या गेली तर अर्जदार व त्यांच्या मुलांचा हक्क हिरावला जावु शकतो. त्यामुळे तो हक्क अबाधीत ठेवण्यासाठी सदरील अर्ज मंजुर करून गैरअर्जदार यांच्या वडीलांना नामे श्री. दिनकर शामराव थोटे यांना सदरील प्रकरणात पक्षकार

गैरअर्जदार क्र. २ म्हणुन शामील करणे योग्य ठरेल. म्हणुन मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदाराने या आदेशापासुन १४ दिवसांच्या आत संबंधीत दुरूस्ती करावी.

स्वा/-

**(आर.एल.राठोड)**

**कळमेश्वर** **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**

**दि. १४.१२.२०२३** **कळमेश्वर, नागपूर**